प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

जानेवारी 1, 2016.

**श्री. साई नागरी सहकारी बँक लि. मुखेड, जिल्हा नांदेड, महाराष्ट्र**
**हयांना दिलेल्या सूचनांना, जून 30, 2016 पर्यंत मुदतवाढ**

श्री साई नागरी सहकारी बँक लि., मुखेड, जिल्हा नांदेड, महाराष्ट्र हयांना दिलेल्या सूचनांना रिझर्व बँकेने, पुनरावलोकन करण्याच्या अटीवर, आणखी सहा महिन्यांसाठी, म्हणजे, डिसेंबर 31, 2015 रोजी व्यवहार बंद झाल्यापासून ते जून 30, 2016 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ही बँक जुलै 1, 2015 पासून सूचनांखाली होती.

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, 1949 च्या (एएसीएस) कलम 35अ च्या पोट कलम(1) खाली तिला दिल्या गेलेल्या अधिकाराचा वापर करुन ह्या सूचना जारी करण्यात आल्या होत्या. संबंधित जनतेच्या माहितीसाठी ह्या सूचनांची एक प्रत वरील बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

रिझर्व बँकेने ह्या सूचना दिल्या असण्याचा अर्थ, त्या बँकेचा परवाना रद्द करण्यात आला आहे असा लावला जाऊ नये. बँकेची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत ती बँक, निर्बंधांसह बँक व्यवहार करणे सुरु ठेवू शकते. परिस्थितीवर अवलंबून, रिझर्व बँक ह्या सूचनांमध्ये बदल करण्याचा विचार करु शकते.

**अजित प्रसाद**
सहाय्यक महाव्यवस्थापक

वृत्तपत्र निवेदन: 2015-2016/1555